Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. VII, Aug,2012
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# संयुक्त राष्ट्रसंघाचा मानवाधिकाराबाबत दृष्टीकोन

रविंद्र पांडुरंग भणगे

राज्यशास्त्र विभाग, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती

***प्रस्तावना :–***

मानवाधिकार म्हणजे असे अधिकार जे मनुष्याच्या जीवनाला प्रतिष्ठा देणे, त्याचा आदर करणे, त्याचा विकास करणे आणि त्याच्या सर्व स्वाभाविक अधिकारांचे जतन करणे होय. हे सर्व अधिकार मनुष्याला त्याच्या संस्कृती आणि श्रमातून प्राप्त होतात. मानवाधिकार आणि मुलभूत स्वातंत्र्य हे जन्मजात असून त्याचे संरक्षण आणि विकास करणे ही सरकारची जबाबदारी असते. मानवाधिकाराच्या संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्र संघ पार पाडते आहे. त्या संदर्भातील शास्त्रशुद्ध मांडणी प्रस्तुत शोध पत्रातून केलेली आहे.

संयुक्त राष्ट्रसंघ व मानवाधिकार :–

जून 1945 ला सॅनफ्रान्सिस्को येथे संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करताना अमेरिका, ब्रिटेन, फ्रान्स आणि रशियाचे शासन प्रमुख एकत्र आले असताना चाळीस निमशासकीय धार्मिक गटाचे प्रतिनिधी सभेस हजर होते. यावेळी मनुष्याच्या मूलभूत अधिकारांच्याबाबतीत जास्तीत जास्त प्रभाव टाकून, स्त्रियांचे अधिकार, मजूर संघटना स्थापन करण्याचा अधिकार आणि धार्मिक समुदाय स्थापन करण्याचा अधिकार इत्यादींना त्यामुळेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या कलमामध्ये अंतर्भाव करण्यास प्रवृत्त केले गेले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या चार्टरमधील पहिल्या आणि इतर सहा कलमात मनुष्याच्या मूलभूत अधिकाराचे आणि मुलभूत स्वातंत्र्याचे विस्तृत वर्णन करण्यात आले आहे. जगातील सर्व स्त्री–पुरूषांना समान वागणूक देण्यात यावी तसेच राज्य आकाराने लहान असो किंवा मोठे त्या सर्वांना समसमान अधिकार प्रदान करण्यात यावेत. मानवाधिकाराचा सन्मान करणे आणि कोणत्याही प्रकारे जात, लिंग, भाषा, किंवा धर्म इत्यादीबाबतीत भेदभाव न करता सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक बाबतीत सर्वांना समान संधी उपलब्ध व्हावी असे नमुद करण्यात आले.[1]

संयुक्त राष्ट्रसंघाच्या घोषणेत एक विस्तृत प्रस्तावनेशिवाय 30 अनुच्छेद आहेत.2 संयुक्त राष्ट्रसंघाच्या निरनिराळया कलमांमध्ये मूलभूत अधिकाराचे दोन भाग पाडण्यात आले असून पहिल्या भागात सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अधिकारांचा अंतर्भाव होतो. दुसऱ्या भागात नागरी व राजकीय अधिकारांचा समावेश करण्यात आला असून या दोन्ही अधिकारांना ''इंटरनॅशनल बीऑफ ह्युमन राईटस'' असे संबोधण्यात आले आहे. 1976 मध्ये 148 देशांच्या शासन प्रमुखांनी एका सभेत आंतरराष्ट्रीय पातळीवर सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अधिकारांना पाठिंबा देऊन राष्ट्रीय पातळीवर या अधिकारांचे जतन, संवर्धन आणि अंमलबजावणी करण्याचे सर्वांनी मान्य केले. संयुक्त राष्ट्र संघाच्या चार्टरप्रमाणे सर्वांना काम करण्याची संधी उपलब्ध व्हावी, जीवन जगतांना सर्व मानवांचे संरक्षण व्हावे, राहणीमानाचा दर्जा कायम राहावा आणि शारीरिक व मानसिक स्वास्थ्य सर्वांना लाभावे तसेच सर्वांना शैक्षणिक अधिकारासह सांस्कृतिक स्वातंत्र्य तसेच वैज्ञानिक प्रगती करण्याची संधी मिळावी असे ठरविण्यात आले कलम 22 ते 27 पर्यंत सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अधिकार खालीलप्रमाणे नमुद केलेले आहेत–

1) सामाजिक सुरक्षिततेचा अधिकार, 2) काम करण्याचा अधिकार व समान कामाला समान वेतन मिळण्याचा अधिकार, 3) संस्था–संघटना स्थापन करून त्याचे सभासद होण्याचा अधिकार 4) व्यापार – व्यवसाय करण्याचा अधिकार 5) राहणीमानाचा दर्जा कायम ठेवण्याचा अधिकार म्हणजेच शारीरिक व मानसिक स्वास्थ्य चांगले ठेवण्याचा अधिकार, 6) शिक्षण घेण्याचा व शिक्षण देण्याचा अधिकार 7) सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये भाग घेण्याचा अधिकार.[3]

संयुक्त राष्ट्रसंघ ही संघटना जागतिक पातळीवर सामान्य लोकांची प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सामाजिक, आर्थिक, राजकीय वगैरे पातळीवर जोपासना आणि संरक्षण करते आणि म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाला मानवतेचे संरक्षण करणारा रखवालदार म्हणावयास हरकत नाही. संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या विकास कार्यक्रमात मानवाच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण व जनत करण्यास अग्रक्रम दिला असून 1946 मध्ये मानवाच्या सर्वांगिण विकास व प्रगतीसाठी एका आयोगाची स्थापना केली. त्यावर एका उच्च आयुक्तांची नेमणूक करण्यात आली. या उच्च आयुक्तांचा दर्जा सुरक्षा परिषदेच्या सेक्रेटरी जनरलच्या बरोबरीचा आहे. आमसभेने फेब्रुवारी 2004 ला कॅनडाच्या लूईस आरबोट यांना संयुक्तराष्ट्रसंघाच्या आयोगाचे आयुक्त म्हणून नेमणूक केली. त्यांचेकडून मनुष्याच्या मुलभूत अधिकारांचा अहवाल आर्थिक व सामाजिक मंडळाला सादर केला जातो. त्याचप्रमाणे उच्च आयुक्त निरनिराळया शासनाच्या प्रतिनिधीशी मुलभूत अधिकारासंबंधी बोलणी करतात.[4]

मानवाधिकारांच्या संरक्षणाची व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका उत्तरोत्तर वाढतच आहे.[5] संयुक्त राष्ट्रसंघाला मानव अधिकराची यंत्रणा शक्तिशाली आणि परिणामकारक करण्यासाठी उच्च आयुक्त निरनिराळया देशाच्या शासनाशी प्रत्यक्ष

**Please cite this Article as :** रविंद्र पांडुरंग भणगे **,** संयुक्त राष्ट्रसंघाचा मानवाधिकाराबाबत दृष्टीकोन **: Indian Streams Research Journal (Sept. ; 2012)**

संपर्क साधून बोलणी करतात. संयुक्तराष्ट्रसंघाच्या पहिल्या चार्टमध्ये मुलभूत अधिकारासंबंधी असे म्हटले आहे की, आम्ही संयुक्त राष्ट्रसंघाचे सभासद असा निर्धार करतो की मानवाच्या मुलभूत अधिकारांची आणि मूलभूत स्वातंत्र्याची हमी देऊन असा ठाम विश्वास व्यक्त करतो की, पुरूष किंवा स्त्री आणि राष्ट्र लहान असो अथवा मोठे या सर्वांना समान अधिकार आणि समान विकासाची संधी उपलब्ध करून देण्याची हमी देतो. 1951 नंतर शत्रु देशातील नागरीक, सैनीक यांची युद्धापुर्वी किंवा युद्धात किंवा युद्धानंतर हत्या करण्याला आंतरराष्ट्रीय गुन्हा समजण्यात येईल असे एका कलमान्वये नमूद करण्यात आले. दुसऱ्या महायुद्धात हिटलरने लाखो 'ज्यु' लोकांची निर्घृण हत्या केली होती आणि यालाचा इतिहासात 'न्युरेमबर्ग क्राईम' असे म्हणतात. याच कायद्याआधारे युगोस्लाव्हियावर कार्यवाही करण्यात आली. तसेच मध्य आफ्रिकेच्या रेवांडाच्या शासनाविरूद्ध कार्यवाही करण्यासाठी 'इंटरनॅशनल क्रिमीनल ट्रिब्यूनल फॉर रेवांडाची स्थापना करून कार्यवाही करण्यात आली.[6]

आणिबाणीच्या काळात म्हणजे युद्ध किंवा गृहयुद्धांच्या वेळी स्त्रिया आणि लहान मुले यांचे संरक्षण राज्याने करावे आणि याची संपूर्ण जबाबदारी राज्यावरच राहील असे संयुक्त राष्ट्रसंघाच्या कलमामध्ये नमूद करण्यात आले आहे. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या आणि शीतयुद्धाच्या काळात लाखो स्त्रिया आणि लहान मुले मारली गेली म्हणून हा ठराव मंजूर करावा लागला. 1991 मध्ये 43 देशाच्या सरकारांनी मृत्यूदंडाची शिक्षा बंद करण्यात यावी असा ठराव करून सुरक्षा समितीपुढे स्वाक्षऱ्या केल्या. खून करणाऱ्या व्यक्तीला फाशी द्यावी किंवा देऊ नये हा वाद–विवादाचा मुद्दा असून यावर जागतिक पातळीवर राजकीय व बुद्धिवंत लोकांचे एकमत झालेले नाही तसेच निरनिराळया देशातील न्यायाधिशांचेही यावर एकमत झालेले आढळत नाही.7 जगातील प्रत्येक व्यक्तिला उदरनिर्वाहाचा किंवा प्रवासाच्या निमित्ताने एका देशातून दुसऱ्या देशी जाण्याचा अधिकार देण्यात आला. या ठरावाची अंमलबजावणी डिसेंबर 2002 मध्ये करण्यात आली. प्रत्येकाच्या अधिकारांचे संरक्षण या ठरावाप्रमाणे करण्यात येईल असे गृहीत धरून निरनिराळया देशांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या केल्या यालाच 'प्रोटेक्शन ऑफ ऑल राईटस ऑफ मायग्रेशन' असे म्हणतात. 2004 मध्ये याकरिता कायदेशीर व बेकायदेशीरपणे राहणाऱ्या लोकांचे सर्वेक्षण करण्यासाठी एका समितीचे गठन करण्यात आले. व्हिएन्ना या शहरी 171 देशाचे प्रतिनिधी तसेच जागतिक पातळीवरील 700 अशासकीय संघटनांचे प्रतिनिधी तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या विभागाचे आयुक्त आणि इतर अधिकारी या संमेलनात एकत्र आले असताना मानवाच्या मुलभूत अधिकारांचे जतन व पालन करण्याची हमी आणि मान्यता देण्यात आली.[8]

निर्वासितांना आसरा देण्याचा अधिकार या ठरावाला मान्यता देऊन सदस्य देशांनी संधीवर स्वाक्षऱ्या केल्या. या अधिकाराची प्रत्येक देशाने अंमलबजावणी करावी असे ठरले. 142 देशांनी या संधीला मान्यता दिली. संयुक्त राष्ट्रसंघाने निर्वासितांच्या समस्या सोडविण्याकरिता एका वेगळया आयोगाची स्थापना करून त्यावर देखरेखीसाठी एका आयुक्तांची नेमणूक करण्यात आली आहे. या आयोगाकडे आंतरराष्ट्रीय जबाबदारी सोपविली आहे. इस्त्राईल आणि पॅलेस्टाईन या दोन देशांच्या भूप्रदेशाबाबतीत अनेक वर्षापासून संघर्ष आहे. 1948 आणि त्यानंतर लाखो पॅलेस्टाईन मुस्लिम बेघर झालेत. संयुक्त राष्ट्रसंघाने 7 लाख 50 हजार निराश्रीत लोकांकरिता मध्यपूर्वेकडील जॉर्डन, लेबनान, सिरिया, गाझापटटी आणि वेस्टबॅक याठिकाणी कॅम्पमध्ये राहण्याची, खाण्याची व शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. युनोच्या आमसभेत 1949 मध्ये 'युनायटेड नेशन रिलीप, ॲन्ड वर्कस एजंसी फॉर पॅलेस्टाईन रिफयूजी' ची स्थापना करण्यात आली. यात सुधारणा करण्यात येऊन एक मॅडेंटव्दारे याची मुदत 30 जून 2005 पर्यंत वाढविण्यात आली.[9]

1974 च्या युनोच्या आमसभेत कोणतीही व्यक्ती उपाशी राहणार नाही आणि त्यामुळे तिचा मृत्यू होणार नाही याची काळजी सर्व राज्यांनी घ्यावी आणि सर्वांना सकस आहार मिळावा याची व्यवस्था करावी असे ठरविण्यात आले. दरवर्षी लाखो लहान मुले सकस आहाराच्या अभावी योग्य प्रकारे त्यांच्या आरोग्याची काळजी न घेतल्यामुळे दगावतात. त्याचप्रमाणे युद्ध किंवा गृह–युद्ध यामुळेही लहान मुलांचा मृत्यू होतो. त्यामुळे युद्धाला मानवी गुन्हा समजण्यास आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली यामुळे लहान मुलांचे संरक्षण होण्यास जागतिक पातळीवर मदत होईल तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमांतर्गत 'युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड' सुरू केला आहे. 1989 च्या संधीप्रमाणे लहान मुलांशी कोणत्याही प्रकारचा अनैतिक व्यवहार, लैंगिक संबंध, मुला–मुलांची विक्री, शारीरिक व मानसिक छळ यातना दिल्यास, अवैधरीतीने लहान मुला–मुलींना दत्तक घेतल्यास, युद्धाच्या वेळी, नंतर किंवा आधी हत्या केल्यास तो आंतरराष्ट्रीय गंभीर गुन्हा समजण्यात येऊन अशा प्रकारच्या गुन्हाविरूद्ध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय न्यायालयात खटला भरून त्या विरूद्ध किंवा राज्याच्या शासनकर्त्यांविरूद्ध गंभीर कार्यवाही करण्यात येईल असे ठरविण्यात आले. निरनिराळया देशाच्या प्रतिनिधींना या संधीला मान्यता देऊन अंमलबजावणी करण्याचे ठरविले.[10]

सर्वसामान्य दृष्टिकोणातून विचार केल्यास मुलभूत अधिकाराचे जनत करणे हे देशाच्या शासकीय नीतीवर अवलंबून असते असे मत लुईस मेन किन यांनी मांडले आहे. ज्या देशात सांसदीय लोकतांत्रिक शासन पद्धती असते. त्या देशात सामान्यतः व्यक्तींच्या मूलभूत अधिकाराची जोपासना केली जाते आणि मूलभूत अधिकारांवर अतिक्रमण किंवा हनन होण्याच्या समस्या किंवा तक्रारी फार कमी प्रमाणात आढळतात याऊलट साम्राज्यशाही किंवा भांडवलशाही किंवा राजेशाही शासनप्रणाली असते त्या देशात मूलभूत अधिकाराची दखल फार कमी प्रमाणात घेतली जाते. इराण, इराक, अफगाणिस्तान आणि सौदी अरेबिया या मुस्लिम राज्यात तसेच मध्यपुर्वेकडील काही देशात अलीकडे मुलभूत अधिकरांचे वारंवार हनन होण्याच्या गंभीर तक्रारी युनोकडे येत असून युनो याबाबतीत परिषदा, सभा, संमेलने आणि अधिवेशन आयोजित करून मूलभूत अधिकारांवर चर्चा करीत आहे. कधी–कधी युनो त्या–त्या देशाच्या किंवा राज्याविरूद्ध कार्यवाही करते. सोमालिया, बुरंडी, रवांडा व फॉर्मोसा युगोस्लाव्हिया यांच्या विरूद्ध आंतरराष्ट्रीय न्यायालयामार्फत कार्यवाही करून शिक्षा करण्यात आली आहे. ज्या–ज्या वेळी मानवाधिकारावर अतिक्रमण झाले त्या–त्यावेळी संयुक्त राष्ट्रसंघाने आणि सुरक्षा परिषदेने त्या–त्या देशांच्या विरूद्ध सैनिकी कार्यवाही करून, व्यापारावर बंदी घालून किंवा शस्त्रास्त्रावर बंदी घालून आंतरराष्ट्रीय नियमाप्रमाणे वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली. जसे इराक, युगोस्लाव्हिया, लिबिया, रेवांडा, सोमालिया, सुदान, अंगोला, सिरिया, अफगाणिस्तान इत्यादी.[11]

निष्कर्ष :–

24 ऑक्टोंबर 1945 ला संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना झाल्यापासून मानवाधिकाराच्या जतनासाठी अनेक कायदे करून निर्णय घेऊन त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यामुळे आज जगभर स्त्रिया, बालके, निर्वासित, अल्पसंख्यांक, कैदी, युद्धकैदी यांना किमान मानवी हक्क प्राप्त झाले आहेत. लोकांवर होणाऱ्या अमानवी अन्याय, अत्याचारांना प्रतिबंध बसला आहे. पिडीतांना मानवतेच्या भूमिकेतून न्याय प्राप्त होणे शक्य झाले आहे. असे असेल तरीदेखील एकूणच मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन अपेक्षेप्रमाणे होत नसल्याच्या काही घटनादेखील समोर येत राहतात. या सर्व समस्या ज्या मानवाधिकारांवर गदा आणणाऱ्या आहेत त्या सर्वांवर उपाययोजना संयुक्त राष्ट्रसंघटना करून प्रत्येक देशातील प्रत्येक व्यक्तीच्या अधिकारांची हमी व त्यांना सुरक्षित करण्याचा विश्वास व जबाबदारी पार पाडतांना दिसून येते.

संदर्भसूची :–

1.पंजवाणी करीम इब्राहीम – 'संयुक्त राष्ट्रसंघ व अशासकीय संघटना', अव्दैत प्रकाशन, अकोला, 2007, पृ.क्र.141.
2.गाबा ओमप्रकाश – 'समकालिन राजनिती सिद्धांत', मयुर पेपरबैक्स, नोएडा, 2006, पृ.क्र.160.
3.पंजवाणी करीम इब्राहीम – 'संयुक्त राष्ट्रसंघ व अशासकीय संघटना', अव्दैत प्रकाशन, अकोला, 2007, पृ.क्र.142.
4.उपरोक्त, पृ.क्र. 143.

5.फाडिया बी. एल. – 'आंतरराष्ट्रीय राजनिती', साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा, 2005, पृ.क.542.
6.पंजवाणी करीम इब्राहीम – 'संयुक्त राष्ट्रसंघ व अशासकीय संघटना', अव्दैत प्रकाशन, अकोला, 2007, पृ.क.144.
7.उपरोक्त, पृ.क. 144.
8.उपरोक्त, पृ.क. 145.
9.उपरोक्त, पृ.क. 146.
10.उपरोक्त, पृ.क. 147.
11.उपरोक्त, पृ.क. 148.